**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री मल्हार मिनरल्स, प्लॉट क्रमांक १५, आर.एस. क्रमांक १०९/१/बी, सी प्रभाग, सीता कॉलनी, जैन बोर्डिंगसमोर, करवीर, जिल्हा- कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांच्या श्रेणी "बी१" चा प्रस्तावित परळी बॉक्साईट खाण, गट नं. २२३ (भाग), गाव-परळी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र ७.५४ हेक्टरमधील ७.१२ हेक्टर खाण क्षेत्र, वाहतूक रस्त्याचे क्षेत्र – ०.४२ हेक्टर क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,३५,००० टीपीए उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. **श्री मल्हार मिनरल्स, प्लॉट क्रमांक १५, आर.एस. क्रमांक १०९/१/बी, सी प्रभाग, सीता कॉलनी, जैन बोर्डिंगसमोर, करवीर, जिल्हा- कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य** यांच्या श्रेणी "बी१" चा प्रस्तावित **परळी बॉक्साईट खाण, गट नं. २२३ (भाग), गाव-परळी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र ७.५४ हेक्टरमधील ७.१२ हेक्टर खाण क्षेत्र, वाहतूक रस्त्याचे क्षेत्र – ०.४२ हेक्टर क्षेत्रातूनबॉक्साईटच्या १,३५,००० टीपीए** उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक ०९ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परळी पैकी मांडवकरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री विद्यासागर वि. किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री निखिल घरत, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. समीर शिंगटे, उप विभागीय अधिकारी,तालुका-पन्हाळा,जिल्हा-कोल्हापूर, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. **श्री मल्हार मिनरल्स, प्लॉट क्रमांक १५, आर.एस. क्रमांक १०९/१/बी, सी प्रभाग, सीता कॉलनी, जैन बोर्डिंगसमोर, करवीर, जिल्हा- कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य** यांचा त्यांच्या प्रस्तावित प्रकल्प श्रेणी "बी१" चा प्रस्तावित **परळी बॉक्साईट खाण, गट नं. २२३ (भाग), गाव-परळी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र ७.५४ हेक्टरमधील ७.१२ हेक्टर खाण क्षेत्र, वाहतूक रस्त्याचे क्षेत्र – ०.४२ हेक्टर क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,३५,००० टीपीए** उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक २९-११-२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ब – १ अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शासनाने ७.५४ हेक्टर परळी बॉक्साईट ब्लॉकसाठी लीज मंजूर करण्यासाठी MMN-0719/C.R.42 (Part-६)/IND-9, दिनांक ११-०९-२०१९ व्दारे लेटर ऑफ इंटेंट (LOI) जारी केले. लिलाव प्रक्रियेत ५० वर्षांच्या कालावधीसाठी मे. श्री मल्हार मिनरल्स यांना लेटर ऑफ इंटेंट (LOI) जारी केले.

प्रकल्पासाठी खाणकाम आराखडा भारतीय खाण ब्युरो (IBM) ने दिनांक ३१-०७-२०२० रोजी मंजूर केलेला आहे.

सदर क्षेत्र ही वनजमीन आहे. ७.५४ हेक्टर क्षेत्र, सर्व्हे नं. २२३ (भाग) अंतर्गत समाविष्ट अहे. वन विभागाची परवानगी मिळविण्यासाठी प्रकल्प धारकांनी अर्ज सादर केलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०६ सप्टेंबर २०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट् शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०७-०९-२०२३ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ मार्च, २०२२ ते ३१ मे, २०२२ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २८-०२-२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

तद्नंतर उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी कार्यालयीन टिप्पणी दिनांक ०३-०३-२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदरील टिप्पणी दिनांक ०५-०३-२०२५ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद शाळा, कासारवाडी (काळमवाडी), तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-२३/२०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०४०२-एफटीएस-०१४९, दिनांक ०२-०४-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

सदरहू अधिसूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २०-०३-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

तदनंतर प्रकल्प प्रवर्तक यांनी त्यांच्या दि. ०९ एप्रिल २०२५ च्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी यांना त्यांची आर्थीक स्थिती हलाखीची असल्या कारणांमुळे सदर सुनावणी रदद करण्यासाठी विनंती केली. त्या अनुषंगाने मा. जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर यांनी सदरील जन सुनावणी रदद केली.

म.प्र.नि. मंडळाने सदर रदद जनसुनावणी प्रकल्प धारकाने केलेल्या विनंती पत्रास अनुसरुन, मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि. २३-०४-२०२५ रोजी सकाळी ११ वाजता ठेवण्यात आलेली पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी रद्द करण्यात येत आहे अशी बातमी दि. २१-०४-२०२५ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्र दै. पुढारी व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात प्रकाशित केली होती तसेच त्याबाबत सर्व संबंधित कार्यालयांना अवगत करण्यात आले होते.

सदर पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी रदद झाल्यानंतर दिनांक ३०-०४-२०२५ रोजी प्रकल्प धारकाकडून सर्व कागदपत्रासहीत सदर सुनावणी पुनश्च घेण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये दि. २३-०४-२०२५ रोजी ज्या ठिकाणी म्हणजे प्राथमिक शाळा परळी पैकी कासारवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर एवजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाव परळी पैकी मांडवकरवाडी ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर या ठिकाणी घेण्यासाठी विनंती करण्यात आली होती.

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी टिप्पणी नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०९ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परळी पैकी मांडवकरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा- कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-४१ / २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी) /पीएच/बी-२५०५१५- एफटीएस -०१२४,

दिनांक १५-०५-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी,कोल्हापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी –<br>प्रादेशिक अधिकारी - कोल्हापूर,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर | - **सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०६-०५-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, कोल्हापूर,
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर,
४. मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२,
५. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.
६. उप विभागीय अधिकारी, पन्हाळा, जिल्हा – कोल्हापूर,
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर,
८. तहसीलदार, तहसील कार्यालय, पन्हाळा, तालुका-पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर,
९. तहसीलदार, तहसील कार्यालय,शाहूवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा- कोल्हापूर,
१०. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शाहूवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा- कोल्हापूर,
११. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, परळी/सोनुर्ले/नांदारी/घुंगुर/अंबर्डे/नांदगांव/ तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर,

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर यांना ९५३ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारच्या भारतीय खाण ब्युरो (IBM) ने प्रस्तावित प्रकल्पाचा खाणकाम आराखडा दिनांक ३१-०७-२०२० रोजी मंजूर केलेला आहे.

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र ७,५४ हेक्टर (वनजमीन) असून खाण क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,३५,००० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेचा प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. प्रकल्पात कुशल आणि अकुशल संवर्गातील ३० व्यक्तींची गरज असुन प्रकल्पातील रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. मात्र सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रकल्पाचे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) उपक्रमात अनेक उपक्रम हाती घेण्याचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद भांडवली खर्चाच्या २% जनसुनावणीत उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अंमलबजावणीसाठी ३.२० लाखांची तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च ₹ ७५.० लाख असून आवर्ती खर्च ₹ ३२.० लाख एवढा असेल.

प्रकल्पात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी अंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्याचा प्रस्ताव आहे. एकूण अर्थसंकल्प १५ लाख रुपये इतका असून तो प्रकल्प बाधित गावांमध्येच खर्च करण्यात येईल.

वन्य जीव कायद्यानुसार वन्यजीव संवर्धन आराखडा तयार करण्यात आलेला असून प्रत्यक्ष सहभागासाठी व अप्रत्यक्ष सहभागासाठी विशेष निधी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी, पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील. ज्यांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, त्यांना संधि देण्यात येईल असे प्रतिपादन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधि देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री रामदास तुकाराम लवंगरे, राहणार- परळी पैकी मांडूरवाडी, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

परळी येथील बॉक्साईट खाण उत्खननाच्या संदर्भात आयोजित केलेल्या जनसुनावणीत मला माझे सूचना/आक्षेप नोंदविण्याची संधि दिल्याबद्दल मी प्रशासनाचे आभार मानतो. कोल्हापूर जिल्ह्यात गेले दोन-तीन दशकांपासून १९ खाणी कार्यरत होत्या. त्या १९ खाणी बंद पडलेल्या आहेत. दोन खाणी चालू आहेत. काही खाणी या पर्यावरण संवदेनशील क्षेत्रात (Environmental Sensitive Zone) मोडत असल्याने त्या बंद करण्यात आल्या. काही खाणी या न्यायालयीन निवाड्यांमुळे बंद पडलेल्या आहेत. तरीही शासकीय प्रशासन नविन खाणी उत्खनन प्रकल्प मंजूरी प्रदान करण्यासाठी का सर्व प्रक्रिया राबवित आहेत?

दुसरा मुद्दा - केंद्र सरकारने शाहूवाडी तालुक्यातील ५१ गावे ही पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (Environmental Sensitive Zone – ESZ) मोडत असल्याचे जाहिर केलेले आहे. सोनुर्ले या गावाचा समावेश पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (Environmental Sensitive Zone – ESZ) करण्यात आलेला आहे. तर सोनुर्ले गाव हे प्रकल्प स्थानापासून फक्त २-३ कि.मी. अंतरावरच आहे.

पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या (Environmental Sensitive Zone – ESZ) २५-३० कि.मी. परिघात कुठलेही उत्खनन करण्यास परवानगी नाही. तरीही येथे उत्खनन करण्याचा घाट घालण्यात आलेला आहे. या परिसरात ८०% लोकांचा व्यवसाय हा शेती आहे. उत्खननामुळे होणा-या जंगलतोडीमुळे जंगलातील विविध प्राणी, पक्षी विस्थापित होणार असून त्यांना मानवीवस्तीत यावे लागणार आहे. येथील शेतक-यांना त्या जंगली प्राण्यांचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

येथील मानवी समाजास त्या जंगलीप्राण्यांपासून धोका होणार आहे. प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

आता बॉक्साईटबाबत स्पष्टीकरण द्यायचे म्हणजे ज्या ज्या ठिकाणी बॉक्साईट उत्खननाचा घाट घालण्यात आलेला आहे, त्या सर्व भागातील अभ्यास केला असता, बॉक्साईट उत्खननापूर्वी त्या क्षेत्रात जी पर्जन्यक्षमता असते, त्या पर्जन्यक्षमतेत खाण उत्खनानंतर घट होण्याचे प्रमाण आढळून येते. त्या क्षेत्रात ३२०० – ३५०० मि.मि. पाऊस पडत होता, तर उत्खननानंतर त्या क्षेत्रात २२००-२५०० मि.मि. पाऊस पडतो. हजार ते बाराशे मि.मि.ची घट झाल्याचे तेथे आढळून येते.

पुढील मुद्दा-शाहूवाडी तालुक्यात ६८% जंगलक्षेत्र असल्याचे घोषित करण्यात आलेले होते. विविध खाणींसाठी जंगलतोड केल्याने आता शाहूवाडी तालुक्यात फक्त ३७% जंगलक्षेत्र राहिलेले आहे. याचाही गांभार्याने विचार करणे आवश्यक आहे.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात दर्शविले आहे की प्रस्तावित खाण खनन प्रकल्पात फक्त ३० (तीस) लोकांनाच प्रत्यक्ष रोजगार (direct employment) मिळणार आहे. फक्त तीस लोकांना रोजगाराची संधि देण्यासाठी आपण ७.५० हेक्टरपेक्षा जास्त पर्यावरणक्षेत्राचे नुकसान करणार आहोत, याबाबत शासनाने वस्तूस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे.

पुढील महत्वाची बाब म्हणजे आपणास प्राप्त झालेली ही वनसंपती ही निसर्गाने दिलेली देणगी आहे. आमच्या पुर्वजांनी या समृध्द वनसंपत्तीचे संवर्धन आणि संरक्षण केलेले आहे. त्या वनसंपतीचे जतन करणे ही काळाची गरज आहे. म्हणून मी प्रस्तावित बॉक्साईट प्रकल्पास माझा संपूर्ण विरोध जाहिर करत आहे.

२) **श्री युवराज आनंदा पाटील, राहणार-घुंग्गुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, प्रकल्प प्रवर्तक:-**

मी या प्रकल्पाचा प्रकल्प प्रवर्तक आणि स्थानिक गावकरी म्हणून याठिकाणी परळी बॉक्साईट ब्लॉक संदर्भात माहिती सांगत आहे. परळी बॉक्साईट ब्लॉक हा २०१९ मध्ये केंद्र सरकारच्या सूचनेनुसार जाहिर लिलावाव्दारे मंजूर झालेला आहे. त्यासाठी सर्वप्रथम ७-८ परवानग्या घ्याव्या लागतात. त्या विविध परवानग्यांचा एक भाग म्हणून ही जनसुनावणी संपन्न होत आहे. शासनाचे असे मत आहे की ज्या गावात प्रकल्प होणार आहे, तेथील जनमत किंवा संबंधित ग्रामपंचायतीचा ठराव घेतलेला पाहिजे. या प्रकल्पास पाठिंबा असलेला ठराव ग्रामसभेने मंजूर केलेला आहे. तो शासनास सादर करण्यात आला. त्यानंतर जिल्हा उपवनसंरक्षक, मा. जिल्हाधिकारी यांच्या समितीने एफआरएस सर्टिफिकेट मंजूर केलेले आहे. त्यानंतरच या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

काही प्रकल्पविरोधी गट जाणूनबूजून दिशाभूल करत आहेत, अफवा पसरत आहेत की सदरहू प्रस्तावित प्रकल्प हा ईएसझेडमध्ये आहे, व्याघ्र संरक्षित क्षेत्रात आहे, तर आज येथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस आलेल्या सर्व जनतेस, पत्रकार बंधू, प्रकल्पविरोधी गट यांना शासनाने प्रदान केलेली मंजूरी वाचून दाखवित आहे. घुंग्गुर, आंबरडे, परळी व शाहूवाडी या गावांची शासनास सादर केलेली माहिती आहे. याची प्रत सर्व पत्रकारबंधूना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

प्रकल्पविरोधी गट काही गावे संवेदनशील क्षेत्रात आहेत असा आरोप करत आहेत, तर ते त्यांनी सिध्द करुन दाखवावे. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी फक्त मुद्दे मांडण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प विरोधी गट "विशाळगड संवर्धन क्षेत्रात" परळी हे गाव मोडत आहेत अशी माहिती स्थानिकांना देत आहेत. तर शासनाच्या मंजूरीत उल्लेख आहे की विशाळगड हे गांव "विशाळगड संवर्धन क्षेत्रात" नाही. तसे सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात आहे का या प्रश्नास उत्तर आहे की नाही. सदरहू प्रकल्प पश्चिम घाट संवर्धन क्षेत्रात आहे का तर उत्तर आहे नाही. सह्याद्री संरक्षक क्षेत्रात आहे का, तर नाही.
प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे माहिती दिली की ही शासकीय मंजूरी आहे. जर ही माहिती खोटी असेल तर माझ्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करु शकता. तरी प्रकल्पविरोधी गटास विनंती आहे की वावड्या बंद कराव्यात. लोकांची दिशाभूल करुन प्रकल्प होऊ न देणे या गोष्टी जनशक्तीतर्फे आपण हाणून पाडू.

तसेच प्रस्तावित प्रकल्पापासून पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात (ESZ) घुग्घुर, आंबरडे, परळी, सावरडे, परखडे, तालुका-शाहूवाडी ही गावे मोडत नाही असे पत्र आहे. तसेच ही गावे प्रस्तावित प्रकल्पापासून Eco-Sensitive Zone व Buffer Zone क्षेत्रात नाही असे पत्र आहे. जर प्रकल्पविरोधी गटास त्याची प्रत हवी असल्यास त्या उपलब्ध करुन देण्यात येतील.

शासनाच्या अहवालानुसार प्रस्तावित प्रकल्पापासून घुंगुर, आंबरडे, परळी, सावरडे, परखडे, तालुका-शाहूवाडी ही गावे राष्ट्रीय अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान किंवा संरक्षित क्षेत्र किती अंतरावर असतील व किती अंतरावर असताना उत्खनन केले जात नाही. केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार आम्ही सदरहू प्रकल्प पूर्णत्वास नेऊ. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की परळी गावाचा वनप्रस्ताव वनअधिनियम, १९८० नुसार केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्याची प्रत जिल्हा उपवनसंरक्षक, जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आलेली आहे. प्रकल्प स्थानापासून संबंधित एक कि.मी.बाहेर असावे, तर परळी गाव हे प्रकल्प स्थानापासून ३२ कि.मी. अंतरावर आहे. राष्ट्रीय उद्यानापासून १०.० कि.मी. बाहेर असणे बंधनकारक आहे. तर परळी गाव हे ३२ कि.मी. अंतरावर आहे. चांदोली अभयारण्य आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्प यांपासून एक कि.मी. बाहेर पाहिजे, तर येथे ३२ कि.मी. बाहेर आहे.

आता प्रश्न आहे पश्चिम घाट संवर्धन क्षेत्र. सोनुर्ले गाव हे पर्यावरणीय संवर्धन क्षेत्रात (ESZ) आहे. पण कायद्यात तरतुद आहे की पर्यावरणीय संवर्धन क्षेत्राच्या (ESZ) हद्दीवर (boundry) असले तरी त्या गावात मायनिंग करता येते. केंद्र सरकारने वेळोवेळी केलेल्या निर्देशांनुसारच हा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

या प्रकल्पासाठी मा. मुख्यमंत्री यांनी आदेश दिलेले आहेत की भले हेतुपत्राची मुदत संपलेली असली तर जनसुनावणी व वनविभागाचे कोणतेही कार्य थांबविण्यात येऊ नये. त्या बैठकीस मी स्वत: हजर होतो व बैठकीच्या इतिवृत्तात माझे नांव आहे. तसेच प्रकल्पास प्रदान करण्यात आलेली प्राथमिक मान्यता (Term of Reference) याची मुदत २०२६ पर्यंत आहे. याबाबत प्रकल्पविरोधी गटाने काहीही वावड्या उठविल्या तरीही कायदेशीरपणे जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शासनाच्या सर्व विहित परवानग्या, अटी व शर्तीचे पालन करुन जनतेच्या ताकदीने प्रस्तावित प्रकल्प हा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**३) श्री संदीप गोपाळ केसरकर, राहणार-घुंगुरवाडी, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

आताच प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की त्यांच्याकडे शासनाच्या संबंधित विभागांनी मान्यता प्रदान करण्यात आलेली कागदपत्रे आहेत. तरी माझी शासनास विनंती आहे की प्रकल्पविरोधी गटास व प्रकल्प प्रवर्तक गट यांना समोरासमोर बसवून एक अहवाल तयार करण्यात यावा व तो शासनास सादर करण्यात यावा.

तसेच पर्यावरणविषयक जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय आघात व त्यावरिल उपाययोजना यांची माहिती जनतेस अवगत करण्यासाठी असते. त्यामुळे बैठकीत बाधित होणा-या गावांतील ग्रामस्थ असणे अपेक्षित आहे. मात्र येथे प्रकल्पबाधित गावांबाहेरिल लोक आलेले आहेत. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की ही जनसुनावणी असून जनतेस उपस्थित राहण्यास प्रतिबंध करणे योग्य नाही. मात्र आपण मुद्दा मांडू शकता.

श्री संदीप गोपाळ केसरकर यांनी मत मांडले की त्यांना सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. कारण या प्रस्तावित प्रकल्पाचा त्रास हा स्थानिकांनाच होणार आहे. त्यामुळे स्थानिकांनाच सूचना, आक्षेप नोंदविण्याची परवानगी द्यावी. अध्यक्ष यांनी मुद्दे मांडण्याची सूचना केली.

श्री केसरकर यांनी सांगितले की वातावरण अनुकूल राहण्यासाठी केंद्र सरकारने ३३% हरितपट्टा बंधनकारक केलेला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील वातावरण हे जंगलवाढीसाठी अनुकूल आहे. खाणींसाठी जंगलतोड होऊन आता १४% जंगलक्षेत्र राहिलेले आहे. त्यात या बॉक्साईट मायनिंगसाठी परत जंगलतोड केल्यास काय परिस्थिती होईल याचा गांभार्याने विचार करणे गरजेचे आहे. माझा या प्रकल्पास पुर्णपणे विरोध आहे.

श्री केसरकर यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना विनंती केली जनसुनावणी समितीतील सदस्य हे उच्च शिक्षित आहेत. येथील जनता नाही. तरी आमच्या भावना लक्षात घेण्यात याव्यात.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच आयोजक यांनी सांगितलेले आहे की ही समिती प्रकल्पास मंजूरी देत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाचे समर्थन करत नाही. ही समिती प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपल्या सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून बैठकीचे व्हिडिओ शुटिंग चालू आहे. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत शासनास सादर करण्यात येत असते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेत असते. तरी सर्वांनी शांततेने मुद्दे मांडावेत.

**४) सौ. वंदना संजय खोत, सरपंच,परळी ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रस्तावित परळी बॉक्साईट प्रकल्पास माझा संपूर्ण पाठिंबा आहे.

**५) श्री दत्तात्रय अप्पाजी खोत, माजी उपसरपंच, परळी ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

माझा या प्रस्तावित प्रकल्पास मरेपर्यंत विरोध आहे. कासारवाडी गाव, गट नं. २२३ मध्ये मी पाणीपुरवठा व्यवस्था आणलेली आहे. माझ्याकडे भूजल विभागाचे भरपूर जलसाठा असल्याचे पत्रे आहेत. मात्र आता विद्यमान सरपंचांनी सांगितले की येथे ३०० मीटर खणूनसुध्दा पाणी नाही. तरी याबाबत संबंधित शासकीय विभागाच्या समितीने त्वरित येऊन पाहणी करावी ही कळकळीची विनंती.

**६) श्री महिपती शंकर खोत, माजी सदस्य, परळी ग्रामपंचायत, राहणार-खोतवाडी, परळी गाव, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पामुळे परळी गावाचे काहीही नुकसान होणार नाही. परळी गावातील ज्या वाड्या आहेत, तेथील लोकांना रोजगाराची संधी मिळेल. तरी सर्व ग्रामस्थांनी या प्रकल्पास समर्थन द्यावे असे आवाहन मी सर्वांना करतो.

**७) श्री सखाराम शंकर खोत, राहणार-कासारवाडी, परळी गाव, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रस्तावित प्रकल्पास माझा विरोध आहे. सह्याद्री पर्वताच्या कुशीत छोटे असलेले कासारवाडी हे गांव आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे गावाला होणार त्रास हा खोतवाडीला जास्त होणार नाही. तसेच रोजगार हा फक्त तीस लोकांनाच मिळणार आहे. माझा प्रकल्पास विरोध आहे.

श्री सखाराम खोत यांनी सांगितले की सह्याद्री फक्त डोंगर नाही, तर ती एक जीवन भूशास्त्रीय जैविक व जलतंत्र यंत्रणा आहे. भूजल लॅटराईड मातीची पृष्ठभाग बेसॉल्ट खडक पावसाचे पाणी साठविण्याचे काम करते. तो काढल्यानंतर पावसाचे पाणी वाहून जाते. पाणी जमिनीत मुरणार नाही, त्यामुळे भूगर्भात पाणीसाठ्याचे प्रमाण कमी होईल. परिसरातील झरे,नाले,ओढे हे आटतील. शेतीवर दुष्परिणाम होणार. परिसरातील विहिरी आटतील. पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने शेतीचे नुकसान होणार आहे.

परिसरातील रहिवाशांचे जीवन हे पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. या प्रकल्पात फक्त ३०% रोजगार मिळेल, तर बाकीच्या माणसांनी कुठे जायचे? याचा विचार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने/शासनाने गांभीर्याने घ्यावा.

या प्रकल्पास माझा पूर्ण विरोध आहे.

**८) श्री पांडुरंग चंद्राप्पा लवंगरे, राहणार-परळी पैकी मांडूरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्प प्रवर्तक यांनी परळी गावातील गट नं. २२३ येथे उत्खनन करावे आणि या दुर्गम भागात रोजगाराच्या संधि उपलब्ध करण्यात याव्यात. मल्हार मिनरल्सने या भागात विकास करावा. तरी कंपनीने शासनाच्या सर्व विभागाच्या परवानग्या घेऊन सदरहू प्रकल्प सुरु करावा.

प्रस्तावित प्रकल्पास पूर्णपणे पाठिंबा.

९) **श्री जीवन मानसिंग सावरा, राहणार-घुंगुर,तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अहवाल सादर केलेला आहे. त्यात पर्यावरण सल्लागार यांनी सांगितलेले आहे की पी.एम.-२.५ व पी.एम.-१० यांची हवेतील पातळी कमी आहे. मात्र जागतिक आरोग्य संघटना (World Health Organization) यांच्या निर्देशांनुसार पी.एम.-२.५ ची पातळी ५.० मायक्रॉन मीटर क्युबिक पाहिजे. पण प्रस्तावित खाण क्षेत्रात ५०.० मायक्रॉन मीटर क्युबिकपेक्षा जास्त म्हणजे दहापटीने जास्त आहे. तर शासनाने हा पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अहवाल कसा स्विकारला असा प्रश्न शासनास विचारण्यात येत आहे.

ज्यावेळी ही पातळी ओलांडली जाते, त्यानंतर खाणक्षेत्रात श्वसनविकार हे तीनपटीने वाढले जातात. असा निष्कर्ष कर्नाटक प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेला आहे. तर त्यांचे मत का घेण्यात आले नाही? त्यानंतर आय.आय.टी., मुंबई यांनी असा अहवाल दिलेला आहे की ३०° पेक्षा जास्त उतारावर खाणकाम झाल्यास भूस्खलनाचा धोका (land slide risk) ६०% ने वाढते. हा जो डोंगर आहे, तो ४५° ते ९०° कोनावर (Angle) उंच (steep) आहे. जर बॉक्साईट खाणकाम केले, तर हा सगळा डोंगर खाली येणार आहे. या मुद्द्याचा विचारच करण्यात आलेला नाही.

त्यानंतर बंगळुरच्या आयआयसीच्या अभ्यासानुसार खाणक्षेत्रात भूजल पातळी ही ६०-७०% घटते. जर एवढी भूजल पातळीत बदल होणार असेल, तर प्रकल्प प्रवर्तक कुठुन पाणी आणतील? प्रकल्प प्रवर्तक तोंडी म्हणत आहेत की पाण्याच्या स्त्रोतांवर काहीही परिणाम होणार नाही. पाणी कुठुन आणणार हे प्रथम सांगण्यात यावे.

खाणकाम करताना मातीच्या वरिल ऑरगॅनिक लेअर काढतो, त्यामुळे मातीची जलशोषणाची क्षमता (infiltration capacity) संपते. पाणी वाहून जाते आणि भूजलाची पातळी जी वाढते, ते संपणार आहे.

जंगल हवेतील $CO_2$ शोषून वातावरण संतुलित ठेवते. जंगलच तोडले, तर $CO_2$ वाढणारच आहे. तरी प्रकल्प स्थानातील AQI काय आहे, तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तपासावा. दिल्ली, मुंबई याठिकाणी ५०० ते ३०० AQI आहे. परदेशातील लोक नावे ठेवताता भारतात हवा प्रदूषण किती आहे. डोंगरात ७,४०० पेक्षा जास्त वनस्पती प्रजाती आहेत. ५०८ पेक्षा जास्त पक्षी प्रजाती आहेत. १८० उभयचर प्रजाती आहेत. ६,००० कीटक प्रजाती आहेत. त्यांचा विचार का करण्यात येत नाही?

गोवा राज्याच्या खनीकर्म विभागाने प्रकल्प प्रवर्तक यांना येथे खाणी करण्याचे पत्र दिलेले होते. त्याच गोवाच्या खनीकर्म विभागाचा अहवाल आहे की खाणीजवळील ६०% झरे हे लुप्त होतात. तर प्रकल्प प्रवर्तकांना आमच्या येतील झरे गायब करावयाचे आहेत का?

सीएसई अहवाल २०११ – ओरिसात खाणकामांमुळे बायोमेटल contaminated पाणी प्याल्याने बरीच मुले जन्मतः दोष घेऊनच जन्माला आली. हे म्हणजे अणुबॉम्बपेक्षाही खूपच वाईट आहे. भारत सरकार लसीकरणाचा कार्यक्रम सक्षमपणे राबवित आहेत, तर येथे दुषित पाण्यामुळे जन्मतः दोष घेऊनच मुले जन्माला येत आहेत.

**प्रकल्प प्रवर्तकांनी भारताचे विविध कायद्यांचे उल्लंघन केलेले आहे. ते खालीलप्रमाणे:-**

**अ)** पर्यावरण (सरंक्षण) कायदा, १९८६,कलम ३ आणि ५,

**ब)** जैवविविधता कायदा, २००२ – कलम १३,

**क)** वन हक्क कायदा, २००६ – ग्रामसभेची संमती आवश्यक-

**ड)** ईआयए अधिसूचना २००६ – पुर्ण हायड्रोलॉजिकल भूवैज्ञानिक अभ्यास आवश्यक

या प्रकल्प अहवालात जलचक्र अहवाल नाही, भूजल सर्वेक्षण नाही, झाडांची नोंद चुकीची आहे. आंतरराष्ट्रीय नियमांप्रमाणे सीबीडी आर्टीकल प्रोटेशन-१ झोनमध्ये खाण वर्ज्य आहे. पॅरिस कराराप्रमाणे कार्बन सिंक जपणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात, सह्याद्री व्याघ्र संरक्षित क्षेत्रात व इतर कोणत्याही अधिसूचित क्षेत्रात मोडत नाही.

मात्र सादरीकरणात दर्शविलेल्यानुसार ०.१ पासून ४.० मीटरपर्यंत Eco Sensitive Zone सीमा आहे. Eco Sensitive Zone १० कि.मी. क्षेत्र बफर झोन असतो. मात्र प्रकल्प प्रवर्तक सांगतात की बफर झोन येत नाही. सर्व चुकीची माहिती देत असल्याने प्रकल्प प्रवर्तकांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविणार आहे.

या प्रकल्पाऐवजी स्थानिकांच्या फायद्याचे तीन वेगवेगळे प्रकल्पांची माहिती देत आहे –

येथे Agro Forestry व सेंद्रीय शेती, मातीची धूप यामुळे उत्पन्न वाढणारे हा प्रकल्प येथे राबविता येईल. पाटगाव हे मधाचे गांव आहे. येथे तसा प्रकल्प राबविता येईल. Eco-Tourism प्रकल्प राबविता येईल. असे प्रकल्प सिक्कीम, गडचिरोली, कोडगु-कर्नाटक येथे करत आहेत. सह्याद्री हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वारसास्थळ आहे. ते मंदिरासारखेच पवित्र स्थान येथील स्थानिकांसाठी आहे. जे जंगल गमावले, तर आपण आपले भविष्यही गमावत आहोत. तरी भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांना येथे Go Go Mining Zone, No Mining Zone अशी विनंती करावयाची आहे. म्हणून माझा या प्रकल्पास पूर्णपणे विरोध आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी मत मांडले की जे भूस्खलन (land slide) होते, ते वरिल माती काढल्यामुळे (top soil) होत नसतो.

**१०) श्री रामभाऊ परळीकर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ता, राहणार-परळी गाव, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

मल्हार मिनरल्स हा जो प्रकल्प होत आहे, असा प्रकल्प आपल्या विभागात प्रथमच होत असून त्याचा आपल्याला अभिमानच पाहिजे. तसेच माझ्यासारखे जे उद्योजक आहेत, ते या समुहाला जोडल्यानंतर दळणवळणाच्या साधनांतून या परिसरात रोजगाराची निर्मिती होईल. त्यातून मिळालेल्या उत्पन्नाचा स्थानिक जनतेस फायदाच होणार आहे. परळी ग्रामपंचायतीने प्रकल्पास मान्यता देण्याचा ठराव हा ८०% बहुमताने पारित केलेला आहे. याबाबत कुठलेही दुमत नाही. आता प्रश्न आहे रोजगाराचा. तर येथे रोजगार नसल्याने येथील जे युवक-युवती कोल्हापूर, पुणे, मुंबई येथे जात आहे.

त्यांना स्थलांतरीत व्हावे लागते.  त्यांना गावातच रोजगार मिळणार आहे.  तरी येथे प्रकल्पाची आवश्यकता आहे.

**११) श्री सचिन केसरकर, राहणार-घुंगुरवाडी, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

माझा संपूर्ण प्रकल्पास विरोध आहे.  कारण आमच्या गावाला घुंगुरवाडी, कासारवाडी, खोतवाडी, मांडलावाडी, परतंगळे या गावांना सायफन पध्दतीने पाणी येत आहे. खाणीमुळे ते सायफन पध्दतीने येणारे पाणी हे पूर्णपणे विस्कळीत होणार आहे. प्रकल्पासाठी खनन सुरु केल्यानंतर वरिल जंगलातील गवे, डुक्कर, बिबट्या हे गावात येतील.  कालच उंड्री गावात बिबट्याने प्रवेश करुन गावातील कुत्री मारली आहेत.  आता जर डोंगर तोडला, तर हे सर्व रानटी जनावरे आपल्या गावात, आपल्या शेतात येणार आहे.

खोतवाडीच्या वरती तलाव शासनाने मंजूर केलेला होता.  तर तो तलाव रद्द करुन तेथे प्रकल्पाचा घाट का करण्यात येत आहे? तेथे तलाव बांधा, तेथे झाडे लावा, मसाई पठारसारखे पर्यटनस्थळ विकसित करण्यात यावे. त्यामुळे तेथे  जास्त प्रमाणात रोजगाराची निर्मिती होईल.

तसेच प्रकल्प प्रवर्तक सांगतात तेथे रोजगार मिळणार आहे.  तर अत्याधुनीक मशिनरी आणण्यात येतील,तर काय रोजगार मिळणार आहे?

उलट या प्रकल्पामुळे खोतवाडी, घुंगुरवाडी येथील ऊसतोडणी कामगारांचे काम कमी होणार आहे. कारण वरच्या भागात बोअर काढल्यास खालील पाणी बंद होते.  आमच्या विहिरीचे पाणी आटलेले आहे. लोकांना हे का समजत नाही? दुस-या कंपन्या आणा, शैक्षणिक संस्था सुरु करण्यात याव्यात.  तरी हा मुद्दा शासनाने **गंभीरपणे घ्यावा ही नम्र विनंती.**

**१२) श्री पांडुरंग शामराव कानद्रे, राहणार-मांडवकरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रस्तावित प्रकल्पास माझा पूर्णपणे पाठिंबा आहे.

**१३) सौ. प्रियंका सखाराम खोत, मुळची रहिवाशी-कासारवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

ज्याठिकाणी प्रस्तावित प्रकल्प उभारणी होणार आहे, त्याठिकाणची मी रहिवाशी आहे.  माझ्या घराजवळच जंगल आहे.  प्रकल्प प्रवर्तक मॅडम आम्हांला जंगलात पडलेले लाकूडसुध्दा आणून देत नाहीत.  तर आपण बॉक्साईटसाठी का त्यांना परवानगी का देत आहेत?  आम्हांला गेले दोन वर्षे जंगलातील लाकडे आणून दिलेली नाहित.  तसेच आम्हां बायकांना तेथे जाऊन देत नाहित.  आता येथे सांगतात की वाघ नाही आहे, तर काही दिवसांपूर्वी वाघाचे पिल्लू दिवसभर आमच्या गावात घेऊन बसलेल्या होत्या, मग ते कसे आले? यासाठी प्रकल्पास माझा पूर्णपणे विरोध आहे.

**१४) श्री महादेव तुकाराम बाडे, राहणार-सावरडे बुद्रुक पैकी गणेवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

मी २०१७ च्या जनसुनावणीसही हजर होतो.  एप्रिलमधल्यासुध्दा होतो आणि आता जूनमधील जनसुनावणीस हजर आहे.  मला या जनसुनावणीस हजर असलेले पिठासन अधिकारी व समस्त स्थानिक नागरिक यांना प्रश्न विचारतो की विशेषकरुन शेतक-यांना गव रेडा हा शेतक-यांचा मित्र आहे

की शत्रू आहे? तर उपस्थितांनी शत्रू असल्याचे सांगितले. तर आता जे पिठासन अधिकारी वाघबीळच्या मार्गाने आलेले असतील, तर वाघबीळच्याखाली पंचगंगा नदीपर्यंत शेतक-याने कुठलाही माज करुन शेतीची राखण करत नाही. मात्र वाघबीळपासून कासारवाडीपर्यंत सर्व शेतक-यांनी ऊसाचे पीक असेल किंवा पावसाळी पीके असतील, त्यांनी माज करुन गवरेडे हुसकावण्यासाठी रात्रभर कंदील, दिवे लाऊन शेती करतात. या शेतक-यांचा हा रात्रंदिवसाचा जागरणाचा त्रास थांबवायचा असेल, तर गवारेड्यांचे नियोजन झालेले पाहिजे. गवारेड्यांचा अधिवास हा सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, Eco-Sensitive Zone किंवा अभयारण्य हा आहे. अभयारण्यातून पळून जनावरे इकडे शेतक-यांच्या शेतात घुसलेली आहेत. जर हा प्रकल्प झाला तर वनखात्यावरिल भार कमी होऊन त्यांच्या अधिवासात कायमचे जातील. आताच येथे मुद्दा मांडण्यात आला की सह्याद्री हे आमचे मंदिर आहे. जरी प्रकल्प उभा राहिलेला नाही, तरीही प्रकल्प प्रवर्तक यांनी गावागावातील मंदिर उभारण्यास मदत केलेली आहे.

तर प्रकल्पासाठी ही जो खडक फोडायचा आहे, त्या खडकावर कुठल्याही प्रकारची वनस्पती नाही. ते लाल कातळ आहे. लहानपणापासून माझे गाव त्या डोंगराला लागूनच आहे. लहानपणापासून शेळ्या राखणे मी केलेले आहे. हा लाल खडक पुर्णपणे खडकाळ आहे. तो खोदल्यामुळे या पंचक्रोशीचा विकासच होणार आहे. ही नैसर्गिक संपत्ती असून नैसर्गिक संपतीमुळे ऑस्ट्रेलियासारखा देश प्रगत झालेला आहे. तर आम्ही का मागे रहावे याचे उत्तर माझ्या प्रकल्पविरोधी बांधवांनी द्यावे.

माझा प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

**१५) मी श्री. सुधीर रंजन, स्थापत्य अभियंताः-**

आपला राधानगरी, शाहूवाडी हा जो भाग आहे, तेथे प्रचंड निसर्ग संपत्ती आहे. शेतकरीबांधवांना त्याची कल्पना नाही की एकदा त्या संपत्तीचा नाश झाल्यास ती परत करता येणार नाही. या प्रकल्पामुळे Bio-Diversity चा मुद्दा उपस्थित होतो. तेथूनच व्याघ्र भ्रमण मार्ग जातो. या प्रकल्पासाठी जे सर्वेक्षण व सादरीकरण करण्यात आलेले आहे, ते नागपूरच्या खाजगी संस्थेने केलेले आहे. त्यांचा या भागाचा अभ्यास नाही. येथे असणारी जैव-विविधता एकदा नष्ट झाली, तर परत होत नाही, परत निर्माण करता येत नाही. लाल माती काढली, डोंगर काढले तर ते परत स्थापन करता येणार नाहीत. बैठकीत जमिन स्खलनाचा (land slide) अभ्यास अजुनही शास्त्रज्ञांना करता आलेला नाही. हे निसर्गाचे गणित आपण सोडवू शकत नाहीत. निसर्गाची रचना किंवा जी जैविक संपत्ती आहे, ती ठेवणे गरजेचे आहे.

येथील समृध्द निसर्गाचा विचार करुन येथे पर्यटन, एग्रो-पर्यटन सारखे व्यवसाय करण्यास सवलत, प्रोत्साहन दिले तर येथील स्थानिक युवक-युवतींना रोजगाराची संधि मिळेल. जर खाणकाम सुरु झाल्यास जे नुकसान होईल, ते कायमचे असणार आहे. त्याची परत दुरस्ती, परत जिर्णोध्दार करता येणार नाही. म्हणून या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**१६) श्री शांताराम रामचंद्र पाटील, गाव-नांदारी, विकाससेवा सोसायटीचा चेअरमनः-**

मी या प्रकल्पाचे समर्थन करत आहे. आमच्या गावाने शंभरटक्के पूर्ण पाठिंबा दिलेला आहे. आमच्या गावाचा समर्थन करण्याचा ठराव सादर करण्यात आलेला आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी या

प्रकल्पासाठी खूपच कष्ट घेतलेले आहे. तरी हा प्रकल्प होण्यासाठी आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

**१७) सौ. दीपीका दीपक दळवी, राहणार-परखंदळे, सदस्य, परखंदळे ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पास माझा पूर्ण विरोध आहे. कारण या प्रकल्पाचे पर्यावरणावर दुषित परिणाम होणार आहे. प्रदूषण होणार आहे. जनजीवन विस्कळीत होणार आहे. बैठकीत असे सांगण्यात आले की ब-याच गावांनी ग्रामसभेत प्रकल्पाच्या समर्थनासाठी ठराव मंजूर केलेले आहेत. मात्र आमच्या परखंदळे गावात या ठरावासाठी एकही सभा झालेली नाही. तसेच इतर गावांतील ग्रामपंचायत कार्यालयात जे ठराव मंजूर केलेले आहेत, ते ग्रामसभेत, सदस्यांना न सांगता परस्पर सरपंचांनी ठराव मंजूरीची पत्र दिलेली आहेत. त्यामुळे या प्रकल्पास आमचा पूर्णपणे विरोध आहे. त्यांनी सह्याद्री पर्वतरांगासाठी कविता सादर केली.

**१८) श्री भीमराव पाटील, परखंदळे सोसायटीचा अध्यक्ष, मानसिंगदादाचा कार्यकर्ताः-**

मानसिंगदादांच्या वतीने परखंदळे सोसायटीतर्फे या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा देत आहे.

**१९) श्री तानाजी लवटे, परखंदळे तर्फे मांडूरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

माझा या प्रकल्पास पूर्ण विरोध आहे. कारण सर्वेक्षण घेण्यापूर्वी अशी अट टाकण्यात आलेली होती की स्थानिकांच्या समक्ष/उपस्थितीत प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघात सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. आम्ही स्थानिक दाखविणार की पन्हाळा पावनखिंडचा राजमार्ग कुठे आहे, आमची धार्मिकस्थळे कोठे,बारा महिने जीवंत पाण्याचे झरे, प्रकल्प प्रवर्तकांच्या गटाने सांगितले की खडकावर एकही वनस्पती नाही. तर आताच येथून उठून आपण वर जाऊन दाखवितो. आम्ही जंगलात राहतो. तर गाडीतून फिरणारे आम्हांला जंगल कसे दाखविणार?

स्थानिकांच्या उपस्थितीत सर्वेक्षण झाल्याशिवाय या बैठकीचा अहवाल शासनास सादर करण्यात येऊ नये.

माझा या प्रकल्पास पुर्ण विरोध आहे.

**२०) श्री संजय खोत, सदस्य, घुंगुर ग्रामपंचायत, सरचिटणिस, भारतीय जनता पक्ष शाहूवाडी तालुकाः-**

माझा या प्रकल्पास संपूर्ण पाठिंबा आहे. डोंगरावर जे खनन करणार आहेत, तेथे दगड आहे. दगड काढल्यानंतर तेथे माती राहणार आहे. तेथे प्रकल्प प्रवर्तक झाडे लावणार आहेत. तरी माझा आणि येथील बहुमताने जनतेचा या प्रकल्पास संपुर्ण पाठिंबा आहे.

**२१) श्री. अमृत दादू जाधव, राहणार-कासारवाडी, गाव-परळी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

निसर्गाने दिलेली देणगी म्हणजे आमचे पाणी. ग्रामपंचायतीने प्रकल्पाच्या समर्थनार्थ ठराव मंजूर केलेला आहे. तर माझी एवढीच मागणी आहे की आम्हांला व आमच्या मुलाबाळांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागू नये.

म्हणून प्रकल्पास माझा विरोध आहे.

**२२)बाळाबाई नारायण सुतार,**

या प्रकल्पाच्याविरुध्द आडवे येण्याचे काहीही कारण नाही. तरी अधिमधी बोलून प्रकल्पात अडथळा आणू नये. सगळयांनी पाठिंबा द्यावा. या प्रकल्पामुळे एकाचा फायदा व दुसरा मरणार असे काहीही नाही. तसेच डोंगरावरिल जनावरे खाली येतील याचीही काळजी करु नये, कारण जनावरे ही आपल्या मनाने खाली येतात.

**२३) अमृता उत्तम पवार, राहणार-सावरेवाडी,तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

आमच्या मुलांना काय सांगणार की पर्यावरणाचा -हास करुन ही बॉक्साईट प्रकल्प आम्ही करु दिला. मुलांच्या भविष्याचा विचार करुन आम्ही या प्रकल्पास विरोध करत असून कायमचा विरोध करणार आहे.

**२४) सौ. शुभांगी कांबळे, विद्यामान सरपंच, घुंगुर,ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पाविषयी मत मांडताना घुंघुर, सावरेवाडी, परळी अशी पाच गावे येतात, ती डोंगरवाडी, वस्तीतील गावे आहेत. या गावजवळ बॉक्साईटसारखे खनिज जे अतिमहत्वाचे, देशहिताचे तसेच समाजहिताचे खनिज मिळत असेल आणि गावातील भूमीपुत्राने स्थापन केलेल्या कंपनीस केंद्र व राज्य सरकारकडून मंजूरीसुध्दा मिळालेली आहे. तसेच स्थानिक गावपातळीवर रोजगार निर्माण होणार आहे. या बॉक्साईट खनिजाच्या खननमुळे सरकारला व गावाला रॉयल्टी मिळणार आहे. स्थानिक अनेक ट्रकवाले, मशिनवाले यांना काम मिळणार आहे. विरोधक केवळ राजकीय भावनेने विरोध करत आहेत. त्यांनाही या गावाची सरपंच या नात्याने विनंती करते की त्यांनी या विकासाच्या प्रवाहात सामील होऊन गावाचा विकास कसा होईल याकडे लक्ष द्यावे. गावची सरपंच या नात्याने मी या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा देत आहे.

**२५)सौ. हकनुबाई तुकाराम जाधव, राहणार-कासारवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

आमच्या बाळगोपाळांसाठी या प्रकल्पास आमचा नकार आहे. आम्ही जगलो आणि मरुन गेलो, तरीही आम्हांला ही ब्रॉक्साईड काहीही कामाची नाही. आमच्या काळबादेवीचे सत्य राहिल्यास पाहिजे. तोटरादेवीला सांगून या प्रकल्पाच्याविरुध्द मोर्चा हा काढणारच आहोत.

**२६)श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राज्य-तेलंगणाः-**

खाणकामाला पाठिंबा देणारा मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे. सरकारने या खाणकामाला परवानगी दिली आहे. जर खाणकाम तोट्याचे असेल तर सरकारला दरवर्षी ४०० कोटींचे नुकसान होईल. रोजगार निर्माण होत आहे आणि जे काही उत्पन्न मिळेल ते मी प्रकल्प प्रवर्तकांना प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना करण्याची विनंती करतो, म्हणजेच पाणी, वायू आणि ध्वनी प्रदूषण काहीही असो.

मी पॅनेल समितीला विनंती करतो की त्यांनी या उद्योगाला बिनशर्त परवानगी देण्यासाठी पर्यावरण आणि पर्यावरण मंत्रालयाची शिफारस करत आहे.

**२७) वैदय हरि कोडिंबा खोत, राहणार-घुंग्घुरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

मी घुंग्घुर गावचा जावई आहे आणि रहिवाशी आहे. मी महाराष्ट्राचाही जावई आहे. हे जे काही चाललेले आहे, ते अतिशय वाईट चालले आहे. ही शासनाने नोंद घ्यावी.

पन्हाळा व परळी गाव किती उंचावर आहे याची तुम्ही अभ्यास करावा. येथे ४०० फूटावर पाणी लागत नाही, पण डोंगरावर ४० फुटावर पाणी लागते. याची शासनाने नोंद घ्यावी.

या जंगलात ७,९०,००० वनस्पती आहेत. ही वनस्पती माणसाचे आयुष्य वाढविण्याचे काम करते. आणि आपण वनस्पती उध्वस्त करण्याचे काम करत आहेत. याची नोंद घ्यावी. माझा या प्रकल्पास विरोध आहे.

**२८) श्री निवृत्ति पाटील, राहणार-घुंगुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

माझे बालपण घुंगुर गावातच गेले. माझ्या आजोबांपासून माझे कुटुंब शेती करत असून घुंगुर गावाचा पायाच शेती आणि शेतीच आहे.

दुसरी गोष्ट अन्न हे पिकलेच पाहिजे. बैठकीत उपस्थितांनी जे मुद्दे सांगितले त्यात त्यांनी या प्रकल्पास पर्याय म्हणून पर्यटन विकास. नंतर पाटगाव मधाचे गाव आहे, तसा व्यवसाय विकसित करणे. तसेच परिसरात आजूबाजूच्या गावात जे तलाव आहेत, ते पर्यटन स्थळ म्हणून विकसित केले, तर स्थानिकांना चांगलाच रोजगार मिळेल.

मी २०१७ च्या जनसुनावणीस होतो आणि २०१७ पासून या प्रकल्पास विरोधच करण्यात आलेला आहे. मग आतापर्यंत ज्यांनी विरोध केला त्यांनी येथे आतापर्यंत पर्यायी उद्योग का उभे केले नाहीत. म्हणजे आपण काहीही करायचे नाही, दुस-यास करु द्यायचे नाही.

माझा या प्रकल्पास १००% पाठिंबा आहे.

**२९)श्री रमेश पिंपळे, माजी उपसरपंच, परखंदळे, विद्यामान सदस्य, परखंदळे ग्रामपंचायत,तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पास बरीच वर्षे विरोध करत आहोत. कारण छत्रपती शिवाजीमहाराजांची आमची जी सांस्कृतिक स्थळ आहेत, आमचे जंगल, आमच्या येथील वनक्षेत्र, गावातील लोकांना पाणी व्यवस्था हे मुद्दे चर्चिलेले आहेत. प्रकल्पास विरोध अशासाठी आहे की येथील काही लोक म्हणतात की आम्हांला रोजगार उपलब्ध होणार आहे. तर कुठल्हा प्रकारचा रोजगार उत्पन्न होणार हा विचार व्हावा. आज शासनाच्या माध्यमातून मनरेगा सारखे कार्यक्रम करताना गावात शौचालय बांधायचे असले, तर कर्नाटकातून माणसे आणावी लागतात. विहिर खणायची, घरकुल योजनेसाठी सर्व कर्नाटकातूनच लोक आणावी लागतात. जर रोजगाराचाच मुद्दा असेल, तर गावात कोणीही उपाशी मरत नाही. आता प्रश्न खाण उद्योगाचा, तर त्याशिवाय कुठलाही उद्योग आणा, आम्ही परखंदळयाचे गायरानसुध्दा देण्यास तयार

आहोत. पण आमच्या वनक्षेत्राला, आमच्या जंगली प्राण्यांना, आमच्या शेतीला कुठल्याही परिस्थिती इजा, प्रदूषणाचा त्रास होता कामा नये.

तसेच या खाणीतून काढण्यात येणारे बॉक्साईट हे दुस-या राज्यातच जाणार, कारण त्यावर पुढील प्रक्रिया व उत्पादन करण्यासाठी येथे कुठलाही उद्योग नाही. तसेच जवळील उदगीर वगैरे गावातील लोक उद्योगासाठी दुसरीकडे गेले. यामुळे काय राहणीमान उंचावले? तेथील जमिनीही उध्वस्त झालेल्या आहेत. उदगीरचे जंगल उध्वस्त झालेले आहे. कालच तेथे बिबट्याने धनगरवाड्यातील मुलीली खाल्ले. जंगलातील सर्व प्राणी हे मानवी वस्तीत येण्यास सुरवात झालेली आहे. या प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्या येथील गावांना हाच त्रास होणार आहे.

म्हणून आमचा या प्रकल्पास विरोध आहे.

**३०) श्री सर्जेराव गिरी, संचालक, परखंदळे सेवा संस्था, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

परखंदळे गावात तीन वाड्या आहेत. तेथे गायरान क्रमांक ७३५, ४१४अ, हे पुर्णपणे गायरान आहे. तेथे झाडे लावायची. तर आज प्रत्यक्षात एक एकरही रान नाही. तिथे सर्व बाजूंनी अतिक्रमणे झालेली आहेत.

दुसरी गोष्ट परखंदळे असे गांव आहे की गेले दहा वर्षे आमच्या गावात ग्रामपंचायतीचे कार्यालय नाही. एवढी वाईट अवस्था आमच्या गावाची आहे. तसेच शासनाने सावे नदीवरुन दोन कोटी खर्च करुन पाणीपुरवठा योजना आणली. ती सुरळीत चालू आहे. परखंदळे गावात ७०-८०% आजी-माजी सैनिक आहेत. त्यांचा शासनाने घरपट्टी/मालमत्ता कर माफ केलेला आहे. ग्रामपंचायतीस उत्पन्नाचे साधन नाही.

हा प्रकल्प झाल्यास ग्रामपंचायतीस महसूल मिळेल, त्यामुळे गावातील सामाजिक योजना राबविता येतील. म्हणून प्रकल्पास माझा पाठिंबा आहे.

**३१) श्री अनिल दत्तु दळवी, राहणार-परखंदळे,तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

ही प्रस्तावित बॉक्साईट प्रकल्पाची जनसुनावणी आहे. पाण्याची योजना आम्ही आणली, मात्र पाणी एक दिवसा आड मिळते, तेही कसेबसे पाच घागरी मिळते. माझी विनंती आहे की ही जनसुनावणी ही आडगावात लावलेली आहे, ती परखंदळे गावात लाऊन बघा. त्या त्या गावात जनसुनावणी आयोजित करुन गावातील लोकांचे म्हणणे ऐका. त्यानंतर निर्णय देण्यात यावा. परखंदळे गावात आता बघा, बायका शेतात राबत आहेत, सर्व परखंदळे हे फक्त भातपीकावर जगत आहे. ४०-५० गवे रेडे येत असतात. गवारेडे कळपच्या कळप येथे येतात, शेताची नासाडी करतात. जंगल उध्वस्त केल्यानंतर गवा गोठ्यात बांधण्याची पाळी येईल. ती आमच्यावर पाळी आणू नका.

प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**३२) श्री रंगराव कृष्णा किटे,राहणार-सावरडे बुद्रुक,तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

मी पंचवीस वर्षे सरपंच म्हणून गावात काम केलेले आहे. गावाचा विकास कोठेही अपुरा ठेवलेला नाही. गेले पन्नास वर्षे मी राजकारणात आहे.

माझा या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

**३३) सौ. रुक्मिणी राजवर्धन सरनोबत, कोल्हापूरच्या नामांकित केआयटी कॉलेज तर्फे:-**

आम्ही पर्यावरण अभ्यासक, अभियंता म्हणून येथे आलेले आहोत. येथे आपल्याला दोन्ही गटांचा फायदा करायचा आहे. विकासाच्या विरुध्द आपण नाही. त्याप्रमाणे शेतकरी बांधवाचेही हित पाहावयाचे आहे. जसे आपले वडिल हे आपल्या घराचे छत्र असतात, तसेच येथील वनक्षेत्र हे आपले छत्र आहे. तर आपल्या बापासारखे छ्त्र जर हिरावून घेणार आहात, तर कंपनीचे नियोजन आपल्याला जाणून घ्यायचे आहे.

तसेच प्रस्तावित प्रकल्पात रेड मड या वेस्टची विल्हेवाट कशी लावण्यात येणार आहे याबाबत स्थानिक शेतकरी जागरुक आहेत का? प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी पाझरुन आपल्या येथील भूपृष्ठावरिल पाण्यात मिसळणार आहे, तसेच भूगर्भातील पाण्यातही मिसळणार आहे. तर या प्रकल्प उत्पादनानंतर सांडपाणी मिसळल्याने ते पाणी पिण्यायोग्य राहिल का, याची सर्वांना कल्पना आहे का? त्याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांचे काय नियोजन आहे, याचे येथे स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. तसेच परिसरातील शेतीची सुपिकता या प्रकल्पामुळे कमी होणार आहे.

मी कोणाच्या कंपनीच्या बाजूची नाही, तसेच प्रकल्पविरोधी गटाच्याही बाजूची नाही. आपणास त्यातून सुवर्णमध्य साधायचा आहे. विकास हवा त्याचप्रमाणे पर्यावरणाचा -हासही करावयाचा नाही.

जसे समाजातील एखादा घटक कमी झाला, तर त्याचा इतरत्र परिणाम होतो. येथे जंगलतोड झाल्याने जंगलातील विविध प्राण्यांचे नैसर्गिक चक्राचा समतोल बिघडतो. आपण पुढच्या पिढ्यांचाही विचार केलाच पाहिजे. त्यासाठी उपाययोजनांची माहिती देण्यात यावी.

**३४) श्री शिवप्रसाद पाटील, राहणार-घुंगुर,तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

मी केआयटी, कोल्हापूरचा विद्यार्थी आहे. उपस्थित सौ, सरनोबत यांनी ज्या सूचना केल्या त्या योग्य आहेत. प्रस्तावित ब्रॉक्साईट प्रकल्प ब्लॉक प्रकल्पाची उभारणी पर्यावरणाची कोणतीही हानी न होता करण्यात यावी. हा प्रकल्प सुरु झाल्यानंतर अनेक अप्रत्यक्ष उद्योगधंदे निर्माण करु शकतो. समजा जेसीबी ट्रक्स विकत घेण्याची एखाद्याची क्षमता नसेल तरी त्यासंबंधित अनेक उद्योग काढू शकतो. माझा या प्रकल्पास पाठिंबा आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की नविन मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. अगोदरच्या मुद्द्यांवर कुठलेही भाष्य करण्यात येऊ नये.

**३५) श्री तानाजी मारुती रवंदे, अध्यक्ष,सह्याद्री पर्यावरण बहुउद्देशीय संस्था:-**

माझा असा मुद्दा आहे की गट नं.२२३ हा सर्व गट पश्चिम घाट भागात येतो. तेथे अनेकप्रकारची जैवविविधता आहे, जंगले आहेत. अनेक प्रजातींचे पक्षी, प्राणी आहेत. कातळाच्या चारी बाजूने दहा फूटापेक्षा कमी अंतराने पाण्याचे झरे आहेत. त्यामुळे या प्रकल्पास आमचा विरोध आहे. येथील राजकारणी सांगतात की २५%, ८०% लोक माझ्यामागे आहेत. तर आता एकतरी आला आहे काय? त्या व्यक्ती एकट्याच आलेल्या आहेत, मात्र सांगतात की ८०% लोक माझ्यामागे आहेत. आता शेतीची कामे सुरु झालेली आहेत. आता भातासाठी पेरणी सुरु झालेली आहे. याचाही सर्वांनी विचार करावा. येथे आमचे कोणाशीही शत्रुत्व नाही. जो श्वासोश्वास आम्ही घेतो, तोच श्वासोश्वास प्रकल्प अधिकारी व लोक घेणार आहेत. जगण्यासाठी शेतात राबवून पिकवावे लागते. जंगल नष्ट करुन काहीही फायदा नाही, आता महाराष्ट्रात फक्त १८% जंगल उरलेले आहे. पूर्वी ६८% जंगल महाराष्ट्रात होते. ते राजकारण्यांनी नष्ट केलेले आहेत. आमची येथील जनता अशिक्षित आहे, त्यामुळे त्यांना जंगलतोडीचा तोटा कळत नाही. शिवाजीराजा ही आमची शान आहे. त्या राजाची शपथ घेऊन सांगतो की इथला एकही मातीचा कण काढून देणार नाही.

**३६) श्री पांडुरंग तुकाराम खोत, घुंगुरवाडी, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

मी एक नागरिक म्हणून बोलत आहे. मी तीन सुनावण्यांना हजर होतो. मी या प्रकल्पास पुर्ण पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. माझा प्रकल्पास पुर्ण पाठिंबा आहे.

**३७) प्राध्यापिका डॉ. मंजुषा नेत्रदीप सरनोबत, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग:-**

मी इंजिनियरिंग कॉलेजमध्ये पर्यावरण अभियांत्रिकी विभागात आहे. माझे तांत्रिक प्रश्न आहेत. या प्रकल्पामुळे जे हवा प्रदूषण होणार आहे, पार्टीक्युलेट मॅटर बाहेर पडणार आहेत, प्रकल्पात उत्पन्न होणारे, सांडपाणी पाण्यात, मातीत मिसळणार, सांडपाण्यावर काय प्रक्रिया करण्यात येईल ते कोठे करणार याची माहिती देण्यात यावी. पर्यावरण अभियंता म्हणून मला याची माहिती हवी. जनसुनावणीत सादरीकरणात हे दर्शविणे अपेक्षित होते, तरी याची माहिती देण्यात यावी.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व ते इतिवृत्त प्राप्त लेखी सूचना/आक्षेप व सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालयातर्फे महाराष्ट्र शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

**३८) श्री दीपक आनंदा पाटील, अध्यक्ष, शाहूवाडी-पन्हाळापर्यावरण बचाव कृती समिती:-**

मी सर्व जनसुनावणी संपूर्ण ऐकलेली आहे. विरोध करणे व त्यावर उत्तर देणे हे शांततेने ऐकलेले आहे. तरी स्थानिकांनी या प्रस्तावित प्रकल्पासाठी एक समिती गठित करावी.

तसेच आपले गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश हा सर्व विचार करताना जर राष्ट्रीय संपत्ती आपल्याजवळ असेल, तर याबाबत विचार व्हावा. युध्द शस्त्रांना लागणारा अल्युमिनियमचा पत्रा जर आपल्याकडे तयार होणार असेल, तर त्या राष्ट्रीय संपत्तीस हातभार लागेल. बॉक्साईट हा खडक सच्छिद्र आहे. पाण्याचा प्रवाह हा साठून राहत नाही, तर तो त्याच्या खालच्या मातीत साठवला जातो. प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की बॉक्साईट काढल्यानंतर त्यावर मातीचे आवरण टाकून त्यावर वृक्षारोपण करावे. राष्ट्रीय संपत्तीमधून रॉयल्टीच्या रुपात राज्यास व गावाला उत्पन्न मिळणार आहे. तो आपल्या गावाच्या विकासासाठीच खर्च होणार आहे.

या प्रकल्पामुळे परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ होऊन तेथे रोजगाराची संधि स्थानिकांना मिळू शकते. तर त्या रॉयल्टी महसूलातून सर्व ग्रामपंचायतींनी पाणीपुरवठा, आरोग्यसेवा देण्याची मागणी करणे हे योग्य होईल. गावाला शेतीअवजारे पुरविण्यात यावीत ही मागणी करणे योग्य होईल.

बॉक्साईट खाणीतील कच्चा मालावर प्रक्रिया करणारा उद्योग जर शाहूवाडी तालुक्यात चालू केला, तर जवळजवळ पाचहजार रोजगार उपलब्ध होतील.

तरी या प्रकल्पास पाठिंबा देऊन समाजाचे, राज्याचे व देशाचे हित पाहावे. तरी या प्रकल्पास सर्वांनी पाठिंबा द्यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की तेच तेच मुद्दे उपस्थित होत आहेत. तरी नविन मुद्दे असल्यास ते उपस्थित करावेत. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी सूचना/आक्षेप नोंदविणे असेल, त्यांनी ते त्वरित सादर करावेत.

**३९) ॲडव्होकेट मानसिंग सावरे, सामाजिक कार्यकर्ता-घुंगुरगाव, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे, शासकीय प्रशासन यांचे स्वागत व अभिनंदन. प्रकल्प प्रवर्तकांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी आम्ही आमचे मुद्दे दोन्ही जनसुनावणीत मांडलेले आहेत. मात्र तेच तेच मुद्दे येणार आहेत.

**मुद्दा नं.१ -**

ज्यावेळी एखादी कंपनी येत असते, त्यावेळी स्थानिकांना प्रकल्पाची सर्व माहिती देऊन, त्यांना स्थापित होणा-या प्रकल्पाचे फायदे व तोटे याबाबत जागृत्ती करुन तसा ठराव ग्रामसभेत मंजूर घेणे अपेक्षित आहे. तसे कुठेही झालेले नाही.

**मुद्दा नं.२ -**

कारण कंपनीने जरी वचन दिले की झाडे लावणार आणि की लावली, तरीही आतापर्यंतच्या शास्त्रीय अनुभवानुसार खनन केलेल्या जागेवर झाडे रुजतच नाहीत.

**मुद्दा नं.३ –**

जरी ग्रामपंचायतींनी प्रस्तावित प्रकल्पामुळे रोजगाराची संधि मिळेल असे प्रतिपादन केले तरी, २००५ पासून एकाही ग्रामपंचायतीने त्यांचे लेबर बजेट तयार केलेले नाही. म्हणजे ही ग्रामपंचायत प्रशासनाची शोकांतिका आहे. कारण ग्रामपंचायत प्रशासनाच्या हातात रोजगार देणे शक्य असतानाही रोजगार देण्याची भूमिकाच नाही. प्रत्येक वर्षी लेबर बजेट शिकविले जाते, त्याचा आराखडा तयार केला जातो. तर रोजगार का दिला नाही, का कंपनीची मातीच नेल्यानंतरच रोजगार दिला जातो. प्रत्येक ग्रामपंचायतीत लेबर बजेट हे लाख लाख कोटीत रुपयांचे येते. ते बजेट कर्नाटकचे लोक घेऊन जातात, पण स्थानीक मराठी माणूस पुढे येत नाही.

**मुद्दा क्रं.४ -**

पन्हाळगड ते विशाळगड हा राजमार्ग आहे. तो ऐतिहासिक भाग पुरातत्व विभागाकडे आहे. ते कोणीही नाकारु शकत नाही. आपण सर्वजण राजांचे मावळे आहोत, तरी राजांची राजवाट मोडू नका ही कळकळीची विनंती आहे. आता १२ जूलैपासून तेथे ट्रेकिंग सुरु होईल. लाखो लोक येतात. यासाठी आताच रोजगार निर्मिती झालेली आहे. या पर्यटनामुळे. तर या प्रकल्पाचा ३० लोकांना रोजगार काय घेऊन बसलात. येथे लाखो लोक येतात, तेथे जर eco-tourism वाढविले तरच हजारो रोजगाराच्या संधि आपोआपच तयार होतील.

**मुद्दा क्रं.५ -**

पन्हाळगड ते विशाळगड यात पहिलेच लागते ते मसाई पठार. कासपठारासारखे तेथे वनस्पती फुलल्या जातात. पुण्या-मुंबईचे लोक तेथे राहायला येतात, त्यामुळे तेथे रोजगार निर्माण झालेला आहे. तर असे eco-tourism वाढवू या.

**मुद्दा क्रं.६ -**

तेथे कुंवारी देवीच्या येथे स्तंभ उभा राहिलेला आहे. त्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. प्रत्येक दगडाला दगड मारला तर वेगळाच आवाज येतो. हा नैसर्गिक वारसा संपला की परत येत नाही. तो आपण जपलाच पाहिजे.

त्यानंतर येते बांदारी खिंडी. तेथे जांभेश्वर मंदिर आहे. तेथे लाखो लोक येऊन देवदर्शन घेऊन जातात. प्रत्येक रविवारी तेथे गर्दी असते. हा रोजगार नाही का?

**मुद्दा क्रं.७ -**

पुढे मांडलाई देवी आहे. पुढे तोटराई देवी, पुढे पवडाई देवी, पुढे पावनखिंड आहे. तेथील लोकांनी तेव्हा साथ दिली नसती, तर आमचा राजा विशाळगडावर पोहचलाच नसता. तरी हा मार्ग उध्वस्त करायचा नाही अशी माझी विनंती आहे.

**मुद्दा क्रं. ८ -**

घुंगुर, सावरेवाडी व इतर अनेक गावांमध्ये नळपाणी पुरवठा योजना आहे. तर तेथील अनेक गावात पाण्याचे नियोजन कसे करण्यात येणार आहे. आता आम्ही येथील पाणी पीत आहोत. त्याचबरोबर हे शेतीलासुध्दा पाणी आहे. त्याशिवाय जंगली प्राणी,पाळीव प्राणी या सर्वांनाच याचा पुरवठा होत आहे.

**मुद्दा क्रं.९-**

पूर्वीची शेती ही आडव्या पाट्याने पाणी चालायचे. त्याच्याखाली तळे असायचे, त्यास मराठीत ढबळ म्हणायचे. त्या ढबळात पाणी साठवायचे व सर्व शिवार पिकायचा. आता शासनाची विहिरींची योजना आली. विहिरी खोदण्यात आल्या. ढबाळातील पाणी विहिरीत गेले ३० फुटांवर. ३० फुटांवरुन शासनाने बोअर मारण्यास सांगितले, नंतर बोअर मारल्या. १०० फुटांवर पाणी गेले. आज २५० फुटांवरही पाणी नाही. प्रकल्पामुळे पुढच्या पाच वर्षात प्यायलासुध्दा पाणी मिळणार नाही.

**मुद्दा क्रं.१०-**

जंगलात शेततळी आहेत, वनतळी आहेत, पाझर तलाव आहे. सोनुर्ल्याचे धरण आहे. पुढे जाऊन ते आटतील. पलिकडे पावडाईला खोदाई काम चालू आहे. जंगलातील पाणी सोनुर्ल्याच्या धरणात येत होते. तो ओढा आता कोरडा पडलेला आहे. आमचा कळकवण्याचा ओढा, त्याचे पाणी खाली येत आहे. हे शेतीचे, पिण्याचे पाणी घालवायचे आहे का?

**मुद्दा क्रं.११ —**

जंगली प्राण्यांचे मानवांवर हल्ले होतील. जंगली प्राण्यांची व्यवस्था काय करणार आहात? आजच्या पत्रात बातमी आहे की बिबट्याने गावातील कुत्री मारली. कारण जंगलात त्यांना अन्न राहिलेले नाही. गेले दहा वर्षात बेसुमार जंगलतोड झाली. झाडे तोडली. प्रकल्पासाठी झाडे अजून तोडणार. औषधी वनस्पती नष्ट होणार. रानभाज्या नष्ट होतील. जलप्रदूषण, हवेचे प्रदूषण होईल. तर या प्राण्यांचे व्यवस्थापन कसे करण्यात येणार आहे. प्राण्यांच्या हालचालीवर बंधन टाकता येत नाही. तरी ही बॉक्साईट प्रकल्प आम्हांला नको.

**मुद्दा क्रं.१२ -**

श्वसनाचे गंभीर आजार होतील. स्थानीक लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतील. जसे सरपंच म्हणून गावातील सर्वांचीच काळजी घेतली पाहिजे, तसेच जंगलातील सर्व प्राण्यांची, जंगलातील सर्व घटकांचा काळजी घेणे आवश्यक आहे. येथे अध्यक्ष यांनी फक्त मुद्दे मांडण्याचे आवाहन केले.

**मुद्दा क्रं.१३-**

एडव्होकेट सावरे यांनी सांगितले की आज बॉक्साईट उदगीरला तीस वर्षे चालू होते. ती काढून नेली. आजही गावाला रस्ता नाही. आजही दवाखाना, रोजगार नाही. तिथे लोकांना श्वसनाचे विकार झाले, ते गाव सोडून गेले.

आज धोपेश्वर प्रकल्प आहे. आम्ही त्या लोकांना जाऊन भेटलो. घरातील तरुण मुंबईला गेलेले आहेत, घरी म्हातारी माणसे असून ती आजारी आहेत. येथून पैसे घ्यायचे व ते दवाखान्यात खर्च करायचे असतील, तर असला उद्योग आम्हांला नकोच आहे. रस्ते अपघात वाढतील, निसर्गाचे न भरुन होणारे नुकसान होईल. यापूर्वी कंपनीने जंगलतोड केलेली आहे. कंपनीच्याविरुध्द कळे कोर्टात केस प्रलंबित आहे. कोंबडी कापल्यासारखी झाडे कापली आहेत. त्याचे फोटो, व्हिडिओ शुटिंग, पंचनामा आमच्याकडे आहेत. त्यांच्यावर अॅसिड ओतले. तरी या बाबी गांभीर्याने घेण्यात याव्यात.

**मुद्दा क्रं.१४-**

**पाळीव प्राणी व जैवविविधता -**

जे काही पाळीव प्राणी आहेत, शेळ्या आहेत,त्या सर्व जंगलात चरायला जातात. शेती व्यवसायाचे प्रचंड नुकसान होणार आहे. रस्त्यावरची धूळ उडली की श्वसनाचे आजार होतात. प्रकल्पामुळे बारा महिने धूळ असणार आहे. जंगलतोडमुळे जंगलात पाणी नाही, म्हणून ते ऊसात पाणी प्यायला येतात. जंगलातील पाण्यावर पहिला अधिकार हा जंगली प्राण्यांचा आहे. तेसुध्दा आम्ही सायफन पध्दतीने खाली आणले. एकाही ग्रामपंचायतीस वाटले नाही की पाईप टाकून तेथे कुंड बांधावा. येथे नांदारी धरण आहे. तेथे पर्यटन होत आहे.

**मुद्दा क्रं.१५ -**

सदर प्रकल्प नियमबाह्य आहे. जागतिक आरोग्य संघटना.तसेच आंतरराष्ट्रीय दोन कायद्यांची मोडतोड करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारचे ४-५ कायदे मोडीत काढलेले आहेत. तसेच राज्य शासनाचे जवळजवळ २५ पेक्षा जास्त कायदे मोडित काढलेले आहेत.

**मुद्दा क्रं.-१६ -**

गट नं. २२३ वर आहे, तेथील माती आमच्या साखरी नदीत जाते. साखरी नदीतून मनकर्णिका नदी, तेथून कासारी तेथून पंचगंगेला जाते. हजारो कोटी खर्च करुन पंचगंगा शुध्द झालेली नाही. त्यांनी आवाहन केले की मुख्यमंत्रीसाहेब, पंचगंगेला शुध्द करा, आम्ही बॉक्साईटला परवानगी देतो.

पंचगंगा प्रदूषणमुक्त, प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन जवळजवळ सर्व गावांनी केलेलेच नाही. गावातील हगणदारी सर्व ओढ्यातून नदीला जाते. वृक्षारोपण झालेलेच नाही. शतकोटी झाडे लावण्याचा उपक्रम केला. तो २०१६ च्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार झालेला नाही.

वनविभागाकडून बॉक्साईट खाणीला पूर्वीही आणि आतापर्यंत परवानगी मिळालेली नाही.

**४०) सौ. प्रज्ञा युवराज कांबळे, राहणार-सोनुर्ले,तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

येथे बरेच लोकांनी बॉक्साईट प्रकल्प नको म्हणून आक्षेप नोंदविलेला आहे. प्रकल्पामुळे घरातील पुरुषाला, घरातील मुलांना उद्योगधंदा मिळेल. कारण येथे प्रकल्प नसल्याने मुलगा किंवा पती रात्री १० वाजता घरी येतात. रस्त्याने गवारेडे, रानटी डुकरे येत असतात. शेतात रोज राखणदारीस जाताना गवारेड्यामुळे जीव मुठीत घेऊन जावे लागते. परवाच घटना घडली ही राखणदारीस गेलेल्या

माणसाला गवारेड्याने मारलेले आहे. त्यामुळे शेती व्यवस्थित होऊ शकत नाही, पण बॉक्साईट प्रकल्पामुळे स्थानिक मुलांना रोजगार तरी मिळेल.

म्हणून माझा या बॉक्साईट प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले प्रस्तावित प्रकल्पाविषयी ९५३ सूचना/हरकती प्राप्त झालेल्या आहेत. बैठकीत ४० लोकांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. तसेच ज्यांना लेखीस्वरुपात निवेदन द्यायचे आहे, त्यांनी बैठकीनंतर किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, कोल्हापूर येथे सादर करावेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रशासनाने त्यांची भूमिका मांडली, तर येथील जनसमुदायाने त्यांची भूमिका पाडलेली आहे. बैठकीत झालेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्त समावेश करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की या जनसुनावणीस स्थानिकांनी निश्चतच चांगलाच प्रतिसाद दिला. ही जनसुनावणी शांततेत पार पडली त्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानतो व ही जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित करतो.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सदर जनसुनावणी अगोदर तसेच जनसुनावणी दरम्यान या कार्यालयास टपालाव्दारे, व्यक्तीश:, ई-मेल व्दारे देण्यात आलेले लेखी सूचना/आक्षेप (समर्थन-२९४९ व विरोध-११३२) प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त झालेल्या निवेदनांच्या प्रती/ सूचना व प्रकल्प धारकाचे सादरीकरणाच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

**(विद्यासागर वि. किल्लेदार)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(निखिल घरत)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(संजय तेली)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा — कोल्हापूर